# अटकेची मार्गदर्शक तत्वे

## गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय नाशिक

# अटके संबधीची उच्च न्यायालयाची मार्गदर्शक तत्वे

- फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ प्रमाणे जेव्हा एखादा दखलपात्र अपराध दाखल होतो. त्या अपराधाचे अन्वेषणादरम्यान अपराध करणारी किंवा संशयीत  व्यक्ती निष्पन्न होते तेव्हा अशा व्यक्तीस कायदेशिर रित्या विना वॉरंट अटक करून त्यास न्यायालयासमोर हजर करण्याचा तपासी अंमलदाराला फौ.दं.प्र.सं. कलम ४१ प्रमाणे अधिकार आहे. कायदेशिर अटक करण्याचे अधिकार ही अत्यंत महत्वाची कृती आहे. परंतु अटकेमुळे व्यक्तीचे स्वातंत्रावर बंधन येते पोलीसांचे बेकायदेशिर वर्तनामुळे व्यक्तीच्या माानवाधिकारांची पायमल्ली होते.  त्यामुळे एखाद्या व्यक्तीच्या अटकेसंबधीत  डॉ. डी. के. बसु विरूध्द पश्चिम बंगाल सरकार या केस मधील निर्णयाचे अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयाने अटके संबधीत काही मार्गदर्शत तत्वे ठरवुन दिले आहेत ते पुढील प्रमाणे

# अटके संबधीची उच्च न्यायालयाची मार्गदर्शक तत्वे

१) अटक करणारे अंमलदाराने अरोपीस सहजपणे दिसेल अशा प्रकारे स्वत:चे नांव, बक्कल नंबर व हुद्दा लिहिलेली पट्टी परीधान करावी.

२) अटक करणा-या अंमलदाराने आरोपीच्या अटकेबाबत दोन पंचासमक्ष पंचनामा लिहावा, अटक मेमो तयार करून त्यावर अटकेची तारीख व वेळ नमुद करून आरोपीची सही घेवुन संबंधित न्यायालयात पाठवावा.

३) आरोपीच्या अटकेबाबत व त्याला स्थानबध्द केलेल्या ठिकाणाची त्याचे मित्र, नातेवाईक किंवा हितचिंतकांना विनाविलंब माहिती कळवावी.

४) आरोपीचे नातलग, हितचिंतक, मित्र व वकील मिळुन न आल्यास आरोपीच्या अटकेबाबत स्थानिक कायदे विषयक सल्लागार समितीस माहिती कळवावी.

५) अटक / स्थानबध्द करण्यात आलेल्या आरोपीस अटकेची कारणे व जामीन तरतुदी समजावुन सांगाव्यात

# अटके संबधीची उच्च न्यायालयाची मार्गदर्शक तत्वे

६) अटक करणा-या पोलीस अंमलदाराने / कर्मचा-याचे नाव, पद तसेच अटकेसंबधात आरोपीच्या कोणत्या नातेवाईकास, परिचित व्यक्तीस कळविण्यात आले या बाबत सविसत नोंद अटक, कोठडी रजिस्टर व स्टेशनडायरीत करावी.

(७) अटक करतेवेळी आरोपीने स्वत:चा अंगावरील जखमां व त्याचे इतर शारीरिक स्वास्थाची तपासणी वैद्यकीय अधिकारी यांचे कडुन करून घ्यावी, त्याबाबत वैद्यकीय मेमो तयार करून त्यावर आरोपी व अटक करणारा पोलीस अधिकारी यांनी सहया कराव्यात व तपासणी मेमोची एक प्रत आरोपीस द्यावी

८) पोलीस कोठडीत असतांना आरोपीची दर ४८ तासानंतर शासनाच्या आरोग्य विभागा तर्फे नियुक्त करण्यात आलेल्या मान्यता प्राप्त वैद्यकीय अधिका-यांकडुन वैद्यकीय तपासणी करवुन घ्यावी.

# अटके संबधीची उच्च न्यायालयाची मार्गदर्शक तत्वे

९) वरील सर्व कागदपत्रांच्या प्रमाणित केलेल्या प्रती संबधित दंडाधिका-यास सादर करावयात

१०) चौकशीच्या कालावधीत ठराविक वेळी आरोपीस स्वत:च्या वकीलास भेटण्याची परवानगी द्यावी.

११) प्रत्येक व्यक्तीच्या अटकेबाबत संबधित अधिका-याने सविस्तर माहिती १२ तासांत स्थानिक नियंत्रण कक्षास कळवावी. अशा प्रकारे एकत्रित केलेली माहिती नियंत्रण कक्षामधील सुचना फलकावर प्रदर्शित करावी.

१२) आरोपी अन्य जिल्यातील रहिवासी असल्यास संबधीत जिल्हयांच्या नियंत्रण कक्षास माहिती कळवावी. त्याच प्रमाणे पोलीस स्टेशनच्या दर्शनी फलकावरही आरोपीच्या अटके बाबतची माहिती लिहावी.

# अर्नेशकुमार विरूध्द बिहार सरकार या केसच्या अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयाने अटकेसंबधी दिलेली मार्गदर्शक तत्वे

फौ.दं.प्र.सं. कलम ४१ मध्ये दुरूस्ती केली होवुन कलम ४१अ ते ४१ड हे नव्याने समाविष्ट करण्यात आले आहे. याचा अधार घेवुन वरील नमुद केसमध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाचे असे निर्दशनास आले की, एखाद्या आरोपीने सात किंवा सात पेक्षा वर्षा पेक्षा अधिक शिक्षा, दंड किंवा दंड नसलेला गुन्हा केला असल्यास सिआरपीसी कलम ४१ प्रमाणे पोलीस अधिकारी आरोपीतास अटक करू शकत नाही. परंतु पोलीस अधिका-यास आरोपीने गुन्हा केलेला आहे. अशी खात्री झाल्यास तेव्हाच अटक करता येईल. सिआरपीसी कलम ४१ मध्ये स्पष्टपणे नमुद केले आहे की, सर्वच गुन्हयात आरोपीस अटक करण्याची आवश्यकता नाही. सिआरपीसी कलम ४१(१) प्रमाणे पोलीस अधिकारी यांनी आरोपीस नोटीस देवुन सदर नोटीसमध्ये वेळ व ठिकाण नमुद करून आरोपीस त्याप्रमाणे हजर राणेसंबधी कळविले पाहीजे.

# अर्नेशकुमार विरूध्द बिहार सरकार या केसच्या अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयाने अटकेसंबधी दिलेली मार्गदर्शक तत्वे

अनावश्यक विनाकारण पोलीस अधिकारी यांनी आरोपीस अटक करू नये. त्याचप्रमाणे न्यायाधिशांनी सहजा-सहजी कोठडीचा हुकुम करून नये.

या अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयाने सदर क्रिमीनल आपील नं १ १२७७/२०१४ दिनांक ०२/०७/२०१४ नुसार डि.के बसु केस व्यतीरिक्त इतर अटकेची मार्गदर्शक तत्वे दिली आहेत. ती पुढील प्रमाणे

# अर्नेशकुमार विरूध्द बिहार सरकार या केसच्या अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयाने अटकेसंबधी दिलेली मार्गदर्शक तत्वे

१) भा.द.वि.क. ४९८(अ) मधील गुन्हयात पोलीस अधिकारी यांनी सर्वसाधारणपणे आरोपीस अटक करू नये. तसेच ७ वर्ष किंवा ७ वर्षापेक्षा जास्त शिक्षा व दंड अथवा विनांदड अशा सर्व गुन्हयामध्ये अटक करण्याची आवश्यकता भासल्यास सिआरपीसी कलम ४१ मध्ये नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

२) सिआरपीसी कलम ४१(१)(अ)(ब) (ii) प्रमाणे सर्व पोलीस अधिकरी यांनी चेकलिस्ट दाखल केली पाहीजे

३) संबधीत पोलीस अधिकारी यांनी चेकलिस्ट सोबत अटकेची कारणे व अटक न करण्याची संबधीची कारणे या विषयी तपशिलवार माहिती संबधीत मॅजीस्टेट समोर पुढील कार्यवाहीसाठी पाठविली पाहीजे.

# अर्नेशकुमार विरूध्द बिहार सरकार या केसच्या अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयाने अटकेसंबधी दिलेली मार्गदर्शक तत्वे

४) संबधित मॅजीसटेट यांनी आरोपीच्या अधिकृती कस्टडीसांठी पोलीसांची सादर केलेली संपुर्ण रिपोर्ट माहिती आणि कारणे हे संपुर्ण  नोंद करून घेणे व जर मॅजीस्टेट वाटल्यास किंवा त्यांचे इच्छेप्रमाणे कस्टडी वाढतील

५) अटक न करण्याबाबतचे निर्णयाची प्रत गुन्हा दाखल झाले पासुन दोन आठवडयाचे आत मॅजीस्टेट पुढे दाखल केली पाहिजे. जर मुदतीत दाखल न करता आल्यास मुदत वाढविण्याकरीता पोलीस अधिक्षक,पोलीस उप आयुक्त दर्जाचे अधिकारी यांनी योग्य ती लेखी कारणे नमुद करून तशी मुदत वाढवुन घेता येईल

## अर्नेशकुमार विरूध्द बिहार सरकार या केसच्या अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयाने अटकेसंबधी दिलेली मार्गदर्शक तत्वे

६) गुन्हा दाखल झालेपासुन दोन आठवडयात आत सिआरपीसी कलम ४१ अ प्रमाणे आरोपीस हजर राहणेकरीता नोटीस दिली पाहिजे. जर मुदतीत नोटीस न पाठविल्यास नोटीसची मुदत वाढविण्या करीता पोलीस अधिक्षक / पोलीस उप आयुक्त दर्जाचे अधिकारी यांनी योग्य ती लेखी कारणे नमुद करून तशी मुदत वाढवुन घेता येईल.

(७) वर नमुद मार्गदर्शक तत्वांचे अवलंबन न केल्यास संबधित पोलीस अधिकारी विरूध्द खाते निहाय कार्यवाही करण्यात येईल. आणि त्याचप्रमाणे उच्च न्यायालयामध्ये कोर्टाचा अवमान केला म्हणुन संबधीत अधिका-यास शिक्षा होणकरीता खटला दाखल होईल.

# अर्नेशकुमार विरूध्द बिहार सरकार या केसच्या अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयाने अटकेसंबधी दिलेली मार्गदर्शक तत्वे

८) संबधीत न्यायाधिशाने आरोपीस कस्टडी देण्यापुर्वी योग्य ते कारण नमुद करणे गरजेचे आहे. कारण नसतांना कस्टडी दिल्यास संबधीत न्यायाधिशा विरूध्द न्यायाधिशांविरूध्द उच्च न्यायालामार्फत खातेनिहाय चौकशी होईल.

# मा. पोलीस महासंचालक यांनी आरोपी अटके संबधी दिलेल्या करावयाच्या कार्यवाही बाबतच्या सुचना

१) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४१(१)(ii) अन्वये सात वर्षापेक्षा कमी असेल किंवा सात वर्षापर्यंत असु शकेल अशा मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असणा-या दखलपात्र गुन्हयाचा अपराधातील **आरोपीला अटक करावयाची आवश्यकता पोलीस अधिका-यास वाटल्यास**, त्यास अटक करण्यासाठी आवश्यक असलेया कारणांची चेकलिस्ट न्यायालयास सादर करणे आवश्यक आहे. (नमुना क्र. १)

# चेकलिस्ट नमुना क्र. १

(नमुना क्रमांक — १)

**आरोपीच्या अटकेबाबतची चेकलिस्ट**

(फौजदारी प्रकिया संहिता, १९७३ चे कलम ४१(१)(ब)(२) अन्वये)

प्रति,

( न्यायालयाचे नाव )

विषय :— आरोपीला अटक केलेबाबत

संदर्भ :— मा. सर्वोच्च न्यायालयाने अर्नेश कुमार विरूध्द बिहार राज्य व इतर क्रिमिनल अपिल क्र. १२७७/२०१४ (स्पेशल लिव्ह पिटीशन (क्रिमिनल) क्र. ९१२७/२०१३ ) अन्वये दिलेल्या निर्णयानुसार

उपरोक्त विषय व संदर्भान्वये सविनय सादर की, ..................................... पोलीस स्टेशन, गुन्हा रजि. नंबर. .............................. कलम. ................................................ अन्वये तारीख ............ वेळ. .............................. प्रमाणे गुन्हा दाखल आहे. त्यामध्ये (आरोपीचे नाव) .................................... .......... हा आरोपी असून, खालील कारणास्तव त्याला अटक करणे आवश्यक असल्यामुळे त्यास दि. .......... ................... रोजी ................. वा. अटक करण्यात आलेली आहे. त्याची चेकलिस्ट खालील प्रमाणे आहे.

**अटकेच्या कारणांची चेकलिस्ट :**

१. त्याने आणखी कोणताही अपराध करण्यापासून, प्रतिबंध करण्यासाठी,
२. अपराधाचे योग्य प्रकारे अन्वेषण करण्यासाठी,
३. अपराधाचा पुरावा नाहीसा करण्याची शक्यता असल्याने किंवा कोणत्याही रीतीने अशा पुराव्यामध्ये फेरफार करण्यापासून त्यास प्रतिबंध करण्यासाठी,
४. ज्या व्यक्तीस प्रकरणाची वस्तुस्थिती माहीत आहे अशा व्यक्तीस, अशी वस्तुस्थिती, न्यायालयाकडे किंवा तपासी अंमलदार म्हणून माझ्याकडे उघड करण्यापासून परावृत्त करण्यासाठी, अशा व्यक्तीस प्रलोभन दाखविण्यापासून, धमकी देण्यापासून किंवा अभिवचन देण्यापासून त्यास प्रतिबंध करण्यासाठी,
५. त्यास अटक केली नाही तर, जेव्हा आवश्यक असेल, तेव्हा, तो न्यायालयामध्ये उपस्थित राहील याची निश्चिती असू शकणार नाही.

दिनांक :

तपासी अंमलदार सही

मार्फत :

वरिष्ठ पोलीस निरिक्षक,
................पोलीस ठाणे

**टिप :— १. मा. सर्वोच्च न्यायालयाचे वरील निर्देशानुसार आरोपीस अटक केल्यानंतर संबंधीत न्यायालयाला कळविणे बंधनकारक आहे.**

**२. उपरोक्त नमूदप्रमाणे कारणे असून तपासी अंमलदार यांनी फक्त आवश्यक ती कारणे खुलासेवार नमूद करावीत.**

२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४१(१)(ब) अन्वये सात वर्षापेक्षा कमी असेल किंवा सात वर्षापर्यंत असु शकेल अशा मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असणा-या दखलपात्र गुन्हयाचा अपराधातील **आरोपीला अटक करावयाची आवश्यकता नसल्यास** तपासी अंमलदाराने तसे लेखी कारण नमुद केले पाहीजे व त्या बाबत न्यायालयाला फिर्याद दाखल झाले पासुन दोन आठवडयाचे आत कळविले पाहिजे. दोन आठवडयाचा कालावधी उलटुन गेल्यास **न्यायालयाकडे पाठविण्याचे पत्र हे संबधीत परिमंडळ उप आयुक्त / उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे मार्फतीनेच पाठविणे आवश्यक आहे.** (**नमुना क्र.** २)

# चेकलिस्ट नमुना क्र. २

(नमुना क्रमांक — २)

**आरोपीला अटक न करण्याबाबतचे पत्र**

(फौजदारी प्रकिया संहिता, १९७३ चे कलम ४१(१) अन्वये)

**प्रति,**

**( न्यायालयाचे नाव )**

विषय :— आरोपीला तूर्तास अटक करण्याची आवश्यकता नसल्याबाबत..

संदर्भ :— मा. सर्वोच्च न्यायालयाने अर्नेश कुमार विरूध्द बिहार राज्य व इतर क्रिमिनल अपिल क्र. १२७७/२०१४ (स्पेशल लिव्ह पिटीशन (क्रिमिनल) क्र. ९१२७/२०१३ ) अन्वये दिलेल्या निर्णयानुसार

उपरोक्त विषय व संदर्भान्वये सविनय सादर की, ..................................... पोलीस स्टेशन, गुन्हा रजि. नंबर. ............................. कलम. ............................................... अन्वये तारीख ............ वेळ. ............................. प्रमाणे गुन्हा दाखल आहे. त्यामध्ये (आरोपीचे नाव) ................................... ........... हा आरोपी असून, सदर गुन्हयातील कलमांमध्ये शिक्षा ७ वर्षापेक्षा कमी असून, सदर आरोपीस खालील कारणास्तव तूर्तास अटक करणेची आवश्यकता वाटत नाही.

**कारणे :**

१. ...........

२. ...............

३. .............

दिनांक :

तपासी अंमलदार सही

मार्फत :

वरिष्ठ पोलीस निरिक्षक,
................पोलीस ठाणे

**टिप :— १. मा. सर्वोच्च न्यायालयाचे वरील निर्देशानुसार गुन्हा दाखल तारखेपासून दोन आठवडयाचे आत संबंधीत न्यायालयाला कळविणे बंधनकारक आहे.**

**२. जर दोन आठवडयाचे मुदतीत न्यायालयास कळविले नाही तर पोलीस उप आयुक्त दर्जाचे अधिकारी यांचे मार्फतीने योंग्य ती कारणे नमूद करून मुदत वाढवून घेणे आवश्यक आहे.**

३) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४१(१) अन्वये आरोपीला अटक करण्याची आवश्यकता नसल्यास तपासी अंमलदाराने फौजदरी प्रक्रीय संहिता चे कलम ४१(अ)(१) अन्वये आरोपीला समक्ष हजर राहण्याची नोटीस फिर्याद दाखल झालेपासुन दोन आठवडयाचे आत बजावणे आवश्यक आहे. (**नमुना क्र. ३**)

# चेकलिस्ट नमुना क्र.३

(नमुना क्रमांक — ३)

**आरोपीला हजर राहण्याबाबतचे समजपत्र**

(फौजदारी प्रकिया संहिता, १९७३ चे कलम ४१(अ)(१) अन्वये)

प्रति,

( आरोपीचे नाव )

विषय :— हजर राहणेबाबत

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, आपणा विरोधात ..................................... पोलीस स्टेशन, गुन्हा रजि. नंबर. .............................. कलम. ................................................ अन्वये तारीख ............वेळ. .............................. प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हयाचे चौकशी कामी आपण आमचे समक्ष दि. .................................. रोजी ............... .............. वा. ................................................ या ठिकाणी आपणाकडे उपलब्ध असलेल्या दस्ताऐवजासह हजर राहावे.

नमूद वेळी आपण चौकशी कामी हजर न राहील्यास आपणास काहीएक सांगावयाचे नाही. असे समजून आपणाविरोधात पुढील योग्य ती कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी.

दिनांक :

तपासी अंमलदार सही

मार्फत :

वरिष्ठ पोलीस निरिक्षक,
...............पोलीस ठाणे

**टिप :— मा. सर्वोच्च न्यायालयाचे वरील निर्देशानुसार गुन्हा दाखल तारखेपासून दोन आठवडयाचे आत संबंधीत आरोपीला नोटीस देणे बंधनकारक आहे.**

४) तपासी अंमलदाराने आरोपीला समक्ष हजर राहण्याच्या फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४१(अ)(१) अन्वये बजावलेल्या नोटीसला अनुसरून आरोपी हा कलम ४१(अ)(३) अन्वये हजर राहत असेल व अटींचे पालन करीत असेल, तरीसुध्दा आरोपीला अटक करण्याची आवश्यकता वाटल्यास, तशी अटकेबाबतची स्पष्ट कारणे नमुद करूनच कलम ४१(अ)(३) अन्वये अटकेची कार्यवाही करावी. (नमुना क्र. ४)

# चेकलिस्ट नमुना क्र.४

(नमुना क्रमांक — ४)

**आरोपीला नोटीस दिल्यानंतर तो हजर होवून चौकशी अंती केलेल्या अटकेबाबतची चेकलिस्ट**

(फौजदारी प्रकिया संहिता, १९७३ चे कलम ४१(अ)(३) अन्वये)

**प्रति,**

**( न्यायालयाचे नाव )**

विषय :— आरोपीला अटक केलेबाबत

संदर्भ :— मा. सर्वोच्च न्यायालयाने अर्नेश कुमार विरूध्द बिहार राज्य व इतर क्रिमिनल अपिल क्र. १२७७/२०१४ (स्पेशल लिव्ह पिटीशन (क्रिमिनल) क्र. ९१२७/२०१३ ) अन्वये दिलेल्या निर्णयानुसार

उपरोक्त विषय व संदर्भान्वये सविनय सादर की, ..................................... पोलीस स्टेशन, गुन्हा रजि. नंबर. ............................. कलम. .............................................. अन्वये तारीख ............वेळ. ........ ..................... प्रमाणे गुन्हा दाखल आहे. त्यामध्ये (आरोपीचे नाव) ............................................... हा आरोपी असून, सदर गुन्हयातील कलमांमध्ये शिक्षा ७ वर्षापेक्षा कमी असल्याने आरोपीस फौजदारी प्रकिया संहिता, १९७३ चे कलम ४१(अ) अन्वये आमचे समक्ष हजर राहण्याची नोटीस दि. .............................. रोजी देण्यात आली. ती आरोपीस दि............................... रोजी मिळाली.

सदर नोटीसमध्ये नमूद केलेल्या तारीख................. वेळ.................. व ठिकाणी ............................... आरोपी आमचे समक्ष हजर झाला. त्याला आम्ही उपरोक्त गुन्हयासंदर्भात सविस्तर विचारपूस केली व आरोपीने सदर गुन्हा केलेला आहे, याबाबत माझी खात्री झाल्याने, त्यास खालील कारणास्तव अटक करणे आवश्यक असल्यामुळे त्याला दि. .............................. रोजी ................. वा. अटक करण्यात आलेली आहे. त्याची चेकलिस्ट खालील प्रमाणे आहे.

**अटकेच्या कारणांची चेकलिस्ट :**

१. त्याने आणखी कोणताही अपराध करण्यापासून, प्रतिबंध करण्यासाठी,
२. अपराधाचे योग्य प्रकारे अन्वेषण करण्यासाठी,
३. अपराधाचा पुरावा नाहीसा करण्याची शक्यता असल्याने किंवा कोणत्याही रीतीने अशा पुराव्यामध्ये फेरफार करण्यापासून त्यास प्रतिबंध करण्यासाठी,
४. ज्या व्यक्तीस प्रकरणाची वस्तुस्थिती माहीत आहे अशा व्यक्तीस, अशी वस्तुस्थिती, न्यायालयाकडे किंवा तपासी अंमलदार म्हणून माझ्याकडे उघड करण्यापासून परावृत्त करण्यासाठी, अशा व्यक्तीस प्रलोभन दाखविण्यापासून, धमकी देण्यापासून किंवा अभिवचन देण्यापासून त्यास प्रतिबंध करण्यासाठी,
५. त्यास अटक केली नाही तर, जेव्हा आवश्यक असेल, तेव्हा, तो न्यायालयामध्ये उपस्थित राहील याची निश्चिती असू शकणार नाही.

दिनांक :

तपासी अंमलदार सही

मार्फत : वरिष्ठ पोलीस निरिक्षक,
................पोलीस ठाणे

**टिप :— १. मा. सर्वोच्च न्यायालयाचे वरील निर्देशानुसार आरोपीस अटक केल्यानंतर तत्काळ संबंधीत न्यायालयाला कळविणे बंधनकारक आहे.**

**२. उपरोक्त नमूद कारणे ही उदाहरणार्थ असून तपासी अंमलदार यांनी वर नमूद कारणांपैकी एक किंवा त्यापेक्षा जास्त कारणे आवश्यकतेनुसार नमूद करावीत. .**

५) तपासी अंमलदाराने आरोपीला समक्ष हजर राहण्याच्या बजावलेल्या नोटीसला अनुसरून आरोपी हा फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४१(अ)(४) अन्वये हजर राहत नसेल अथवा आपली ओळख पटवुन देत नसेल, तर त्या आरोपीचे बाबतीती न्यायालयाचा अंतरीम जामीन किंवा अटकपुर्व जामीनाचा कोणताही आदेश नसल्यास खात्री करून, सदर आरोपीतास अटक करावी. (**नमुना क्र. ५**)

# चेकलिस्ट नमुना क्र.५

(नमुना क्रमांक — ५)

**आरोपीला नोटीस दिल्यानंतरही आरोपी हा नोटीशीतील अटींचे पालन करण्यास निष्फळ ठरत असल्यास किंवा आपली ओळख लपवित असल्यास त्यास केलेल्या अटकेबाबतची चेकलिस्ट**

(फौजदारी प्रकिया संहिता, १९७३ चे कलम ४१(अ)(४) अन्वये)

**प्रति,**

**( न्यायालयाचे नाव )**

विषय :— आरोपीला अटक केलेबाबत

संदर्भ :— मा. सर्वोच्च न्यायालयाने अर्नेश कुमार विरूध्द बिहार राज्य व इतर क्रिमिनल अपिल क्र. १२७७/२०१४ (स्पेशल लिव्ह पिटीशन (क्रिमिनल) क्र. ९१२७/२०१३ ) अन्वये दिलेल्या निर्णयानुसार

उपरोक्त विषय व संदर्भान्वये सविनय सादर की, ..................................... पोलीस स्टेशन, गुन्हा रजि. नंबर. ............................. कलम. ............................................... अन्वये तारीख ............वेळ. ........ ..................... प्रमाणे गुन्हा दाखल आहे. त्यामध्ये (आरोपीचे नाव) ............................................... हा आरोपी असून, सदर गुन्हयातील कलमांमध्ये ७ वर्षापेक्षा कमी शिक्षा असल्याने आरोपीस फौजदारी प्रकिया संहिता, १९७३ चे कलम ४१(अ) अन्वये आमचे समक्ष हजर राहण्याची नोटीस दि. .............................. रोजी देण्यात आली. ती आरोपीस दि............................... रोजी मिळाली.

सदर नोटीसमध्ये नमूद केलेल्या तारीख................. वेळ.................. व ठिकाणी ............................... आरोपी आमचे समक्ष हजर झालेला नाही. त्यानंतर तो फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४१(अ)(४) अन्वये आपले अस्तित्व लपवित आहे. तसेच सदर आरोपीचे बाबतीत न्यायालयाचा अंतरीम जामीन किंवा अटकपूर्व जामीनाचा कोणताही आदेश नसल्याची खात्री केलेली आहे. म्हणून तो दि. .............................. रोजी ................. वा. .... ..................... या ठिकाणी मिळून आल्याने त्यास विचारपूस करून खालील कारणास्तव अटक करणे आवश्यक असल्यामुळे त्याला अटक करण्यात आलेली आहे. त्याची चेकलिस्ट खालील प्रमाणे आहे.

**अटकेच्या कारणांची चेकलिस्ट :**

१. ..........

२. ..............

३. ............

दिनांक :

तपासी अंमलदार सही

मार्फत : वरिष्ठ पोलीस निरिक्षक,
...............पोलीस ठाणे

**टिप :— १. मा. सर्वोच्च न्यायालयाचे वरील निर्देशानुसार आरोपीस अटक केल्यानंतर तत्काळ संबंधीत न्यायालयाला कळविणे बंधनकारक आहे.**

# प्रश्न व सुचना



# धन्यवाद ....